# दिव्य जीवन



स्वामी शिवानंद
सरस्वती

**वर्षारंभ विशेषांक**

(दिव्य जीवन संघ, पुणे शाखा)
(ज्ञानयज्ञ म्हणून वितरित)
वर्ष ११ । अंक १
**जानेवारी २०१६**



स्वामी चिदानंद
सरस्वती



## ABOUT DIVINE LIFE SOCIETY, RISHIKESH

The Divine Life Society is a shining example of the creative aspect of the Divinity within man. It is a remarkable achievement of the Founder, His Holiness Sri Swami Sivananda, who from the year 1936, has built up the wonderful mansion of 'Divine Life' brick by brick, on the firm foundations of purity, integrity, nobility and magnanimity. The ideals of the Society are lofty, most practicable and within the reach of every human being, irrespective of position, caste, colour, country and creed. The Institution caters to the cultural needs of all ranks of people, to whatever class they may belong. Each one can tap whatever suits him the best according to his stature and intellectual or spiritual attainments. The *Jnana Ganga* (river of knowledge) emanating from the prolific pen of the Great Master Sri Swami Sivananda and his direct disciples, whom the Master has chiseled and molded into his own pattern with the laudable idea of enabling them to continue and further the cause of his lofty mission is continuously flowing.

The lofty ideal of 'Divine Life' has its humble beginning in the building of a true human being, even as the fine superstructure has its small start in the foundation. Just as the strength of a building depends on its foundation which remains silent and invisible, so is the achievement of the Divine dependent on the strenuous preparation of man, to annihilate the animal in him, to develop the human nature and to allow it to blossom into Godliness. Thus there is no Divine Life without one being, or trying to become, human first, and one cannot claim to be a human being merely because he walks on two legs and talks with his tongue. It is our attitude, our behaviour and our dealings with others that go to decide whether we are humans, sub-humans or super humans. Hence the noble Mission of Sri Swami Sivanandaji Maharaj was to bring about the needed transformation in man, to gradually eradicate the animal in him and to unfold the Divinity within to its perfection.

The Divine Life Society carries out its object of a world-wide revival of spirituality through publication of books, pamphlets and magazines dealing scientifically with all the aspects of Yoga and Vedanta, universal religion and philosophy, and ancient medicine; holding and arranging cultural and spiritual conferences and discourses; establishing training centres for the practice of Yoga and the revival of true culture; and taking such other steps from time to time as may be necessary for bringing about a quick moral and spiritual regeneration in the world.

This institution functions as an ideal place of spiritual retreat for the educated citizens of the world, wherein he can renew himself and recreate and refresh his being, physically, mentally, morally and spiritually.

**Departments of Service**

*The Yoga-Vedanta Forest Academy* trains seekers in the knowledge of India's Culture and in the practice of Yoga as a general discipline for developing integral personality as well as human welfare. *The Yoga-Vedanta Forest Academy Press* prints the cultural and spiritual books as well as the periodicals and other literature of the Society. *The Sivananda Publication League* caters to the public this valuable literature. *The Free Literature Section* distributes freely books and other literature to deserving seekers and aspirants the world over. *The Charitable Hospital* renders free medical service to the public and conducts periodical medical relief camps freely. *The Annapurna Annakshetra*, which is the common kitchen of the Ashram, feeds about 600 permanent residents, daily visiting Sadhaks and guests and pilgrims. *The Guest House* looks to the needs of the many visitors and guests (visiting Sadhaks) who come to the Ashram for spiritual guidance and Yoga training. *The Temples* of worship hold prayers for the peace of the world, conduct regular worship and continue the recitation of the Divine Name throughout 24 hours of the day, for the welfare of mankind. *The two Monthly periodicals* ('the Divine Life' in English and 'Divya Jeevan' in Hindi) consist of articles on sublime philosophy and provide guidance of topical value to all the seekers and students of Yoga. *The Library* furnishes reading of some the most precious books in philosophy, Yoga and culture in general. *The Correspondence Section* provides proper replies to countless queries that come from seekers all over the world in the various walks of life. *The Daily Satsanga* held in the Ashram is a perennial source of inspiration to the souls that seek communion with inner peace. *The Yoga Courses* held in other parts of India, outside the Headquarters, in other Institutions and Organisations, are, again, channels of the much-needed inspiration to students, officials and people in general, the work which the Society carries on through its Yoga Instructors who travel for this purpose. *The Divine Life Conferences* held in different places in India have become effective means of mustering in the moral and cultural forces of people and bringing them together for the purpose of achieving individual and social solidarity. *The Cultural Tours* conducted by the senior Swamis of the Ashram have become a byword to anxious

seekers in India as well as in other countries, who are benefited immensely by the teachings, discourses and personal guidance provided by the Swamis travelling for this purpose. *The Personal Guidance* which the senior Swamis at the Headquarters render in a paternal way to hundreds of people coming to the Ashram from the various countries in the world has been ever giving a healing touch to the tension-ridden personalities in society. *The Daily Meditation* sessions are a practical mobilization of mental and soul-force for re-construction of the human personality towards the various noble purposes in life. *The Annual Sadhana Weeks* are Spiritual Camps held in the Ashram, to which hundreds flock in eagerness for cultural and spiritual rejuvenation of their minds and hearts. *The Educational Activities* of the Society consist in helping poor and deserving students, about a thousand in number right from the primary standard to the post-graduate level, by providing them free with the requisite facilities in their studies, as a gesture of the Ashram's goodwill towards the welfare of people. *The Leprosy Relief Work* of the Society is so well-known that it has always been regarded as part and parcel of the love extended by the Society to some 200 or more leper-patients who are rehabilitated and taken care of in a suitable manner. *The Social Service Wing* attends to such services as medical aid to the poor and needy, contribution towards different relief works in the country, and such other gestures of charity as would relieve the sufferings of people, in some measure, from poverty, disease and ignorance.

The Society has several *Branches*, functioning in India as well as in other countries.

**Location**

*Sivananda Ashram*, the Headquarters of The Divine Life Society, is housed at Shivanandanagar, on the right bank of the Ganga, at a distance of 3 kilometers from Rishikesh Town, (Distt. Tehri-Garhwal, U.P., India).

The address-
General Secretary,
The Divine Life Society,
P. O. Shivanandanagar, Pin Code 249 192,
District Tehri-Garhwal, Uttaranchal, India.
Tel: (91)-135-2430040 Fax: (91)-135-2442046
E-mail: generalsecretary@sivanandaonline.org
WWW: http://www.divinelifesociety.org/

### जगद्‌गुरु स्वामी शिवानंद सरस्वती

स्वामी शिवानंद सरस्वती यांचा जन्म ८ सप्टेंबर १८८७ मध्ये तामिळनाडू येथील 'पट्टमडाई' या गावी झाला. श्रेष्ठ विद्वान,संत अप्पय्या दीक्षित यांच्या घराण्यातील वेंग अय्यर व पार्वती अम्मा हे स्वामीजींचे पिता व माता. स्वामींजींचं मूळ नाव कुप्पुस्वामी. लहानपणापासून छोट्या कुप्पुस्वामींला परमेश्वराच्या पूजा-अर्चेमध्ये, भजन करण्यामध्ये रस होता. हरिनामामध्ये तल्लीन होऊन तो नृत्य करी. गरिबांबद्दल त्याच्या मनात कळवळा होता. आपला नवा कोरा कोट एकदा थंडीनं कुडकुडणाऱ्या याचकाला त्यानं देऊन टाकला होता. रसरशीत आरोग्य व सुदृढ शरीराची देणगी कुप्पुस्वामीला होती. कट्टर ब्राह्मण घरातील असूनही त्या काळात समाजात रूढ असलेले जातिभेद त्याच्या मनाला कधीच शिवले नाहीत. एम.बी.बी.एस. झाल्यावर मलाया येथे डॉक्टर कुप्पुस्वामींना नोकरी मिळाली. अत्यंत मनापासून ते रोग्यांची सेवा करीत. त्यांची पैशाची मदत या लोकांना दुःखमुक्त करायला अपुरी ठरत होती. साऱ्या सांसारिक दुःखांवर उपाय ठरणाऱ्या शाश्वत सुखाचा शोध घ्यावा असं त्यांना तीव्रतेनं वाटू लागलं म्हणून ते भारतात परतले. आई-वडिलांना भेटून त्यांनी घर सोडलं. वाराणसीपासून तीर्थयात्रा करीत महाराष्ट्रात पंढरपूर येथे आले व एका पोस्टमनची सेवा करत राहिले. त्यानं 'तपश्चर्या करायची असेल तर ऋषीकेशला जा' असं त्यांना सांगितलं व प्रवासाची सोय करून दिली.

कुप्पुस्वामी हिमालयाच्या कुशीत गंगेच्या किनाऱ्यावर ऋषीकेश येथे आले. त्यांनी कडक तपश्चर्येला प्रारंभ केला. गंगातीरी त्यांची ही तपश्चर्या पाहणाऱ्या स्वामी विश्वानंदजींनी त्यांना संन्यासदीक्षा दिली. आता डॉ. कुप्पुस्वामींचं नाव झालं 'स्वामी शिवानंद सरस्वती !' आपली साधना परिपूर्ण झाल्यावर १९३६ साली त्यांनी 'दिव्य जीवन संघ' या संस्थेची स्थापना केली. आज या संस्थेचे रूपांतर एका जागतिक संस्थेमध्ये झाले आहे. 'दिव्य जीवन संघा'ची मूळ शाखा ऋषीकेश येथे शिवानंदनगरमध्यें आहे. इथे एक सुसज्ज हॉस्पिटल आहे. अनेक रुग्णांवर इथे मोफत उपचार, शस्त्रक्रिया होतात. एक अत्याधुनिक छापखाना आणि वाचनालय आहे. 'दि डिवाईन लाईफ' हे इंग्रजी, 'दिव्य जीवन' आणि 'योग वेदांत' ही हिंदी मासिके इथून प्रकाशित होतात. स्वतः स्वामीजींनी तीनशेच्यावर ग्रंथ लिहिले. हे सारे ग्रंथ उपलब्ध आहेत. या संस्थेच्या काही निवासी पाठशाळा आहेत. १४ जुलै १९६३ मध्ये स्वामी शिवानंदजींनी आपला देह सोडला. गंगाकिनारी स्वामीजींनी उभ्या केलेल्या विश्वनाथ मंदिराशेजारी समाधी मंदिरात आता स्वामी शिवानंदजी दिव्य रुपानं वास करून आहेत.

## स्वामी चिदानंद सरस्वती

'दिव्य जीवन संघा'चे पुर्वाध्यक्ष 'स्वामी चिदानंद सरस्वती' यांचा जन्म २४ सप्टेंबर १९१६ रोजी मंगलोर इथे झाला. त्यांचं पूर्वाश्रमीचं नाव श्रीधर राव. स्वामीजींच्या वडिलांचं घर आणि आजोळ दोन्ही घराणी गर्भश्रीमंत. स्वामीजींचं बालपण एखाद्या राजपुत्रासारखं गेलं आणि कॉन्व्हेंट स्कूल, त्यानंतर लॉयला कॉलेजसारख्या संपूर्ण खिश्चन वातावरण असलेल्या पण उच्च शैक्षणिक दर्जाच्या शाळा व महाविद्यालयात त्यांचं शिक्षण झालं. ख्रिश्चन धर्मातील प्रार्थना, करुणा, सेवा या गोष्टींचा प्रभाव त्यांच्यावर पडला. मात्र घरातून कट्टर सनातनी धार्मिक संस्कारही होत होते. आपले आजोबा, आत्याचे पती अशा कुटुंबियांकडून आध्यात्मिक संस्कारांचा वारसा मिळाला. मुळातच आध्यात्मिक प्रवृत्ती असलेले स्वामीजी पूर्ण विरक्त झाले.

१९ मे १९४३ रोजी स्वामीजी दिव्य जीवन संघामध्ये आले. सुरुवातीला अत्यंत साधी-साधी अंगमेहनतीची कामे देऊन आणि त्याचवेळी साधनेचे मार्गदर्शन करून संघाचे संस्थापक गुरुदेव स्वामी शिवानंद सरस्वती यांनी चिदानंदजींसारख्या कोहिनूर हिऱ्याला पैलू पाडले. स्वामी चिदानंद आश्रमातील दिनचर्या सांभाळून कडक तपश्चर्या करीत. भटकी कुत्री, गोरगरीब, कुष्ठरोग्यांची सेवा करीत. ब्रह्मपुरी ही वसाहत वसवून त्यांनी कुष्ठरोग्यांना निवारा आणि आर्थिक स्वावलंबनाची संधी दिली. स्वामी शिवानंदजींच्या महानिर्वाणानंतर त्यांचे उत्तराधिकारी म्हणून सर्वांनी एकमताने स्वामी चिदानंदजींची निवड केली. त्यांच्या कार्यकाळात दिव्य जीवन संघ जगभर विस्तारला. पट्टमदाई या स्वामी शिवानंदांच्या जन्मस्थानी भलं मोठं धर्मार्थ हॉस्पिटल उभे राहिले. 'शिवानंद होम' हा आश्रमाचा असा भाग उभा राहिला जिथे जगानं नाकारलेल्या कुणालाही आसरा मिळू लागला. दिव्य जीवन संघाची सहा तत्त्वे - सेवा, प्रेम, दान, चित्तशुद्धी, ध्यान, आत्मसाक्षात्कार याचं मूर्तीमंत प्रतीक होते - स्वामी चिदानंद सरस्वती. स्वामी शिवानंदजींचा संदेश त्यांनी लोकांपर्यंत पोहोचवला. 'मी हे शरीर, मन, बुद्धी, अहंकार नाही तर मी त्या परमात्म्याचा अंश आहे.' याचं सतत भान ठेवा.' हा स्वामी चिदानंदांचा संदेश आहे. २८ ऑगस्ट २००८ रोजी स्वामीजींनी महासमाधि घेतली. आणि आपल्या दिव्य रुपाने ते अमर झाले. स्वामीजी दुसऱ्या जागतिक धर्मपरिषदेमध्ये सहभागी झाले होते. जगात धर्मावरून संघर्ष होऊ नयेत म्हणून २५ जणांची एक समिती निर्माण केली होती. त्यामध्ये हिंदू धर्माचं प्रतिनिधित्व स्वामीजी करीत होते. त्यांना 'हिंदू ऑफ द इयर' हा सन्मान प्राप्त झाला होता.




## विश्वात्मक प्रार्थना

प्रेमळा दयाघना, तुला सहस्रवंदना।
सर्वव्यापी ईश तू, सच्चिदानंद तू
सर्व शक्तीमान तू, सर्व जाणताही तू॥
वास हा तुझा असे, सर्व भूतांतरी
दुज्या मनास जाणण्या, समर्थ मन्मना करी॥
लोभ, क्रोध, गर्व हे शिवोत ना मना कधी
द्वेषभावना नको, आमुच्या मनामधी॥
भेदभाव विसरू दे, बुद्धी / भक्ती तूच दे
मोहबंधनातुनी, मनास पार होऊ दे॥
अनेकरूपी तुझ्या, तुला सदैव सेवु दे॥
तुझेच नाम ईश्वरा, आम्हास नित्य गाऊ दे
कीर्तनामध्ये तुझ्या, आम्हा सदैव रंगु दे॥
प्रेमळा दयाघना, तुला सहस्रवंदना॥

*- कै. सौ. चारुशीला नाईक*

**दिव्य जीवन संघ पुणे शाखा वृत्तांत**

- नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचा सत्संग अनुक्रमे १५ नोव्हेंबर आणि १३ डिसेंबर रोजी डॉ. राव यांच्या घरी झाला.
- 'दिव्य जीवन' या मासिक पत्रिकेचा दिवाळी अंक परिवारातील सदस्यांना वितरित करण्यात आला.

**प. पू. स्वामी चिदानंद सरस्वती जन्मशताब्दी पूर्व आध्यात्मिक प्रचार यात्रेचे दि. १४ जानेवारी २०१६ रोजी पुणे येथे आगमन होत आहे. पुणे शाखेच्या वतीने पादुका दर्शन, सत्संग आणि प्रसाद वाटपाचा जाहीर कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.**

**स्थळ :** वेद शास्त्रोत्तेजक सभागृह, सारसबागेजवळ, स्वारगेट, पुणे.

**वेळ :** सायंकाळी ६.३० ते ८

परिवारातील सर्व सदस्यांनी या जाहीर कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा.

**❀ पुणे शाखेचा पत्ता ❀**

**श्री. गो. आ. नगरकर**
'स्वानंद' एस्. २०
सहजीवन सोसायटी
पर्वती, पुणे ४११००९
☎ ९३७०५७०२०६

**श्री. नितीन देशपांडे**
'ईशावास्य', प्लॉट नं. ४९ /सायंतारा,
डी. एस. के. विश्व
धायरी, पुणे ४११०४१
☎ ९८५०९३१४१७ , ९८५०८२६९९०

पुस्त डाक

प्रति

______________________________

______________________________

______________________________

______________________________